जा. क्र. माध्य-३ [१४]/पोजार
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय.
दिनांक:-

19 APR 1986

प्रति,
मा. सेक्रेटरी चिंचवड शिक्षण प्रसारक मंडळ,
चिंचवडगाव, पुणे

विषय:- सन १९८३-८४ व १९८४-८५ या वर्षी विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या परंतु त्रुटी असलेल्या माध्यमिक शाळांना १ वर्ष पुढे मान्यता चालू ठेवण्याबाबत......

महोदय,

आपल्या संस्थेमार्फत चालविण्यात येणारे न्यू इंग्लिश स्कूल, चिंचवडगाव, पुणे या माध्यमिक शाळेस शासनाचे पत्र क्र. -(मसाअ/१०८४/७०११/(उ)-माशि-१ दिनांक 23-8-84 च्या आदेशान्वये विना अनुदान तत्वावर मान्यता मिळालेली आहे. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांनी पाठविलेला आपल्या शाळेचा तपासणी अहवाल पाहता त्यात खालीलप्रमाणे ✓ मार्क केलेल्या त्रुटी या शाळेने पूर्ण केलेल्या आहेत असे दिसले व x असे मार्क केलेले आहे. त्या त्रुटी शाळेने पूर्ण केलेल्या नाहीत. तरी खाली नमूद केल्याप्रमाणे x मार्क केलेल्या ज्या त्रुटी आहेत त्या सन १९८६-८७ या वर्षात पूर्ण होणे आवश्यक आहे. जर सदर त्रुटी आपल्या शाळेने वेळेत पूर्ण केल्या नाहीत तर आपल्या शाळेची मान्यता काढून घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तरी आपल्या शाळेची मान्यता खालील त्रुटी पूर्ण करण्याच्या शर्तीवर सन १९८६-८७ या वर्षाकरिता पुढे चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.

✓ [१] शाळेबद्दल तक्रारी आहेत.
✓ [२] अनावश्यक स्पर्धा होत आहे.
X [३] २ पैकी एक शिक्षक अप्रशिक्षित आहे.
X [४] शिक्षकांचे वेतन बँकेमार्फत केले जात नाही.
X [५] स्वतःची इमारत नाही/भाड्याची इमारत अपुरी आहे.
X [६] प्रयोगशाळेसाठी स्वतंत्र खोली नाही/प्रयोगसाहित्य अपुरे आहे.
X [७] क्रिडांगणासाठी जागा नाही./खेळाचे साहित्य नाही.
X [८] ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली नाही./ग्रंथसंख्या अपुरी आहे.
✓ [९] विद्यार्थी संख्या शासनाने ठरवून दिलेल्या किमान संख्येपेक्षा कमी आहे.
✓ [१०] मुख्याध्यापक व शिक्षकांनी वर्षभराचे कामाचे नियोजन केलेले नाही.
✓ [११] शिक्षकांनी घटक नियोजन केलेले नाही./ दैनिक पाठाचे अ टाचण नाही.
✓ [१२] शालेय कोर्द नोंदी अद्यावत नाही.
✓ [१३] कार्यालयीन रेकॉर्ड अद्यावत ठेवले नाही. [विहित नमुन्यात ठेवले नाही.]
[१४] संस्थेची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नाही.
✓ [१५] फर्निचर अपुरे आहे.

मान्य टिपणीनुसार.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे करिता.

प्रत:- शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे.

Noted